तरुण भारत मंगळवार ६ जानेवारी २०१५

# दोडामार्ग कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलतांना प्रवीण भोसले. बाजूला राष्ट्रवादीचे नेते सुरेश दळवी, प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, सरपंच सागर नाईक आदी. शंकर जाधव

वार्ताहर
दोडामार्ग

समाजात वावरत असताना प्रेरणास्थान शोधण्याच काम प्रत्येक विद्यार्थ्यांनी करावे. जीवनात शिक्षणाबरोबर श्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वत:च्या प्रगतीबरोबर इतरांच्या प्रगतीचा विचार करावा, असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री प्रवीण भोसले यांनी केले. लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. हळबे महाविद्यालयाचे निवासी श्रमसंस्कार शिबीर वझरे येथे झाले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादीचे नेते सुरेश दळवी, सावंतवाडी पंचायत समितीचे माजी सभापती भगवान देसाई, वझरे सरपंच सागर नाईक, विनायक गवस, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील आदी उपस्थित होते.